# प्रकरण पहिले

# पूर्वभ्यासाचे स्वरुप

# प्रकरण १ ले
# पूर्वाभ्यासाचे स्वरुप

कोणत्याही भाषेतील जिवंत सहित्यात नवे नवे प्रवाह उदयाला येत असतात. हे नवे प्रवाह साहित्य समृध्द करीत असतात आणि साहित्यातील चैतन्य टिकवित असतात हे नवे प्रवाह उदयाला आले नाहीत तर ते साहित्य नि:सत्व, दुबळे होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नव-नव्या जाणिवेतून ते लेखन झाले त्यामुळेच तर मराठी साहित्य समृध्द होत चाललेले आहे.

इंग्रजी राजवटीच्या कालखंडात, मराठीतील बहुसंख्य लेखक पांढरपेशा मध्यमवर्गातुन पुढे आलेले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हे चित्र बदलत चाललेले आहे. लिहणे व बोलणे हे व्यवसाय एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित राहिले नाहीत. शिक्षण जसजसे समाजात फैलावत गेले तस-तसे समाजातले उपेक्षित स्तर जागे होत आहेत. आप-आपले अनुभव व्यक्त करण्याची ओढ समाजाच्या सर्व थरातून निर्माण होऊ लागली आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजवर ते दबले गेले दडपले गेले, पिळले गेले होते किंबहुना विशिष्ट प्रकारच्या समाजव्यवस्थेमुळे पशुपेक्षाही हीन जीवन जगत होते त्याचा स्वर, त्याची वेदना, त्याचा विद्रोह त्याच्याच लेखनातून व्यक्त होत आहे याचे मराठी माणसाने स्वागत केले पाहिजे. दलित साहित्य हा मराठी साहित्यातला एक नवा प्रवाह आहे त्याचे रूप जाणून घेतले पाहिजे. त्याचे सौंदर्य शोधले पाहिजे त्याच्या मागील प्रेरणा शोधल्या पाहिजेत व त्यातुन नवसंस्कृतीच्या नवसमाजाच्या आकृतिबंध प्रकट होतो आहे का ? हे ही अभ्यासले पाहिजे. या देशाच्या मातीतून उदयाला आलेले हे साहित्य आहे. महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, वि. रा. शिंदे, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणा घेऊन आज दलित साहित्य वेगवेगळ्या विचारांनी भारलेले आहे. वेगवेगळ्या अंगानी आपला विचार मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. जे - जे भोगले - अनुभवाने आले ते - ते प्रामाणिकपणे समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न त्यानी केलेला आहे.

मानवाने आपली वेदना व्यक्त करण्यासाठी नेहमीच काव्याशी नाते जोडलेले आहे. आपल्या वेदनेला काव्यातून आकार दिलेला आहे. तद्वतच दलित साहित्याने आपली व्यथा वेदना मांडताना, वर्तमानकाळाच्या दाहकतेबरोबर भविष्यकाळाची सुंदर स्वप्ने मांडताना काव्याचा उपयोग केलेला आहे.

सर्वप्रथम संत चोखामेळ्याने

'हीन याती माझी देवा। कैसी घडे तुझी सेवा

मज दूर - दूर हे म्हणती। तुज भेटू कवण्यारिती'

याप्रमाणे आपली वेदना शब्दबध्द केली. पुढे कर्म मेल्याने हाच मार्ग अवलंबिलेला आहे. तर केशवसुतांनी 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या कवितेतुन दलिताची समस्या वेशीवर मांडली त्यानंतर आनंदराव टेकाडे यांनी 'हा हिंद देश माझा' या कवितेतुन

'जगतात कोठे नाही
तो भेद येथे पाही
जन्माने वर्ण ठरवी, हा हिंद देश माझा'
भटास उच पदवी
इतरास नीच ठरवी
धर्मात ठेवी यादवी 'हा हिंद देश माझा'
मनुजास पशुहुन
मानी जो येथे हीन
तोच आर्यवर्त जाण, 'हा हिंद देश माझा'

आपली व्यथा व्यक्त केली. त्याचवेळी किसन फागोजी, शाहीर घेंगडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्यावर कविता लिहून आपली कृतज्ञता व्यक्त केली व नाही लढल्याविन मुक्ती हे सुत्र स्पष्ट केले. त्याचवेळी बाळकृष्ण वासनिक यांनी 'नजराणा' पेश केला. तर वामनराव कर्डक, सोनुले, ना. रा. शेंडे, लखमापुरकर, मधु कोसारे इ. ची कविता धडपडत - धडपडत आपली वेदना व्यक्त करताना दिसते. महाडच्या चवदार तळ्याचा प्रसंग धर्मान्तर व बाबासाहेब आंबेडकराच्या महानिर्वाणाच्या दु:खद क्षण दलितानी अनुभवला व त्याच्याविषयीचे दु:ख कवितेच्या रुपाने बाहेर आले. कवी दीनबंधूनी त्यासाठीच 'भीमजीवनाची गाथा रचली.'

यानंतर मात्र दलित कवितेने नवे रुप धारण केले. आपल्या कवितेतील विद्रोही स्वराला बाबासाहेबाच्या तत्वज्ञानाची जोड दिली, बुद्धाच्या तत्वज्ञानाची शक्ती दिली व मार्क्सच्या तत्वज्ञानाचे अधिष्टान दिले. माणसाने माणसावर केलेल्या अन्यायाला आव्हान दिले. स्वातंत्र्य, समता, बधुत्वांची पूजा स्वीकारली. माणुसकीच्या मुल्यासाठी युद्ध सुरू केले त्यासाठी नामदेव ढसाळानी 'गोला-पीठा', ज. वि. पवारांनी 'नकिबंदी'

दयापवार 'कोंडावाडा', अर्जुन डांगळे - 'छावणी - हालते आहे' वामन निंबाळकरांनी 'गावकुसाबाहेरील कविता', नरेशकुमार इंगळे 'अंगारा', त्र्यंबक सपकाळे - 'सुरंग', प्रल्हाद चेंदवणकर 'ऑडिट', केशव मेश्राम - 'उत्खनन', नाराय सुर्वे 'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा' इ. कविता संग्रहाचे लेखन केले पुढे हिरा बनसोडे, मीना गजभिये या स्त्री कवीयत्रीनीही यात सहभाग दर्शविला.

जाती, धर्म संस्कृतीच्या नावाखाली माणसाने माणसावर जो बहिष्कार युगानूयुगे टाकलेला होता त्याविरुद्ध आवाज उठविला तर औद्योगिक करणामुळे आहे रे, नाही रे चा जो वर्ग निर्माण झालेला होता त्याविरुद्धही प्रचंड आवाज उठविला गेला त्यामध्ये कुसुमाग्रज, वसंत - बापट, वि. दा. करंदीकर, अमर शेख इ. मंडळी अग्रेसर होती. या बरोबरच साम्यवादी विचारसरणीचा स्वीकार त्यांनी आपल्या कवितातुन केला. त्यातुन नारायण सुर्वे सारखे कवी पुढे आले. आपल्या काव्यातुन सामाजिक बांधीलकीची भूमिका श्रद्धेने स्वीकारली. वैश्विक, जाणिवेचा उद्धगार काढला. मुंबई सारख्या औद्योगिक महानगरातील कामगार वस्तीतून पुढे आलेल्या या कवीच्या शब्दाशब्दांला शोषिताची आच आहे, ही आच हेच वेगळेपण आहे. मजुरवर्गाचा अनुभवातुन व साम्यवादी तत्वज्ञानाचा संस्कारातुन या कवितेची जडणघडण झाली.

या प्रकारे दलित कविता आकाराला येत असताना - तिच्यात एकसुरीपणा, आक्रस्तालेपणा, विद्रोहाचा एकच पवित्रा, आशयातील स्थूलपणा, अंधार - प्रकाश अशा स्थूल विरोध दर्शनावरच समाधान - कलात्मक तटस्थतेच्या परिपुर्ण अनुभवाचा अभाव इ. आक्षेप घेतले गेले. त्यातील काहीसे खरे असले तरी तिने मूळ मूल्यापासुन एक वेगळेपणा स्वीकारला आहे. तिचे अनुभव विश्व वेगळे आहे. नव्या जुन्याचा संघर्ष नव्या जाणिवाचा आनंद - अतितटीने वाद - विवाद - करण्याची हौस - नव्या मुल्याचे स्वागत करायचे किंवा विरोध - जे काही आहे ते टोकाला जाऊन करायचे अशी खळबळ असा जल्लोश - असे जागरण व्यक्त केले तेच दलित कवितेचे रूप आहे तिच एक निळी पहाट आहे. दलित कविता म्हणजे निळ्या पहाटे उत्साहाने गायले जात असलेली स्त्रोते आहेत. ती अस्सल भारतीय जाणिवांनी निर्माण होत असल्यामुळे काही त्रुटी असल्या तरी ती कविता आपले सत्व राखून कलात्मक शिखरे गाठू पाहात आहे ही जमेची बाजू ध्यानात घ्यावी लागते.

स्वतंत्रतेचे स्तोत्र गायचे झाल्यास गुण-गुण उपयोगाची नसते तर ते उच्च रवाने, चारचौघापेक्षा उंच ठिकाणी जाऊन गायचे असते. त्यातुन आजूआजूला जाग येते असे नेहमीच सांगितले जाते म्हणूनच दलितांनी रंगभूमीचाही उपयोग आपल्या कार्यात करून घेतलेला आहे. नव्हे तर दलित रंगभूमी

ही काळाची गरज समजून, तिचे आव्हान स्वीकारून आपला आकृतिबंध - नवे कलारूप निर्माण केले आहे. निग्रो लेखकानी आपल्या वाट्याला जे दैन्य, दास्य, पिढ्यानूपिढ्या आले ते दूर करण्यासाठी ब्लॅक थिएटर निर्माण केले तद्वतच रंगभूमीचा उपयोग दलित लेखकानी केला आहे. जो विद्रोह जो नकार याच्या मनात आहे तो जनात रूजल्याशिवाय समाज परिवर्तन घडून येणार नाही हे ओळखुन सत्यशोधक जलशापासून या रंगभूमीचा पाया घातला गेला.

या जलशांनी घरा-घरातून नवक्रांतीचा विचार पसरविला. किसन फागोजी यात पुढे होते म्हणून त्याना दलित नाट्याचा प्रवर्तक संबोधले जाते. संत चोखामेळा हा त्याचा प्रिय विषय म्हणून 'संत चोखामेळा' लिहून अगतिकतेच्या कोडीत सापडलेल्या चोखोबाची वेदना चित्रित करून या समाजात-विषमता, अन्याय, छळ कसा चालू आहे याचे चित्रण केले आहे. त्याबरोबरच 'एका साधूची फजिती', 'भटिणीचा संवाद', 'पारतंत्र्य विमोचन अथवा अंत्यज सुधारण्याचा मार्ग सनातनी धर्माचा 'पंचरंगी' तमाशा लिहीला.

१९४० नंतर अस्पृश्य सत्यार्थ प्रकाशक जलशाचे केरुबुवा गायकवाड यांनी दलित जागृतीसाठी हजारो कार्यक्रम केले. ''शाळेचा प्लॉट'', ''नवरा बायकोचा झगडा'', रिक्रुटिंग - प्लॉट - चिमणचा वग'' हे वग त्यांनी लिहिले. ''गोमाजी कोतवाल'' या वगात भयानक विषमतेमुळे आंतरजातीय - विवाहाची अशक्यता - त्यांनी वर्तविली, तर 'चिमण' च्या वगातून विवाह व त्यातील खर्चामुळे कर्जाचे ओझे वाहणाऱ्या अस्पृश्य समाजावर विदारक प्रकाश टाकला आहे. यापासून स्फुर्ती घेऊन स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलित लेखकांनी नाट्यलेखनाला जोमाने सुरुवात केलेली आहे. प्रा. गणवीर 'नोकरीच्या जाळ्यात', गं. पाननावणे - 'माणुसकीचे बंड', सुरेश वंजारी - 'मृत्युपत्र', दत्ता भगत 'वाटा पळवाटा ', पिंजऱ्यातील पोपट, खुशाल कांबळे 'ग्रामराक्षस', कमलाकर डाहार 'नरवळी', बाबुराव गायकवाड 'नातं', श्री. वाकोडे 'प्रितीचा रिती', श्रीकांत लाल 'गणपतीची कमाल - उदराची धमाल 'शेवंता जिती हाय' रमेश जाधव, इ. नाट्य लेखन या उत्साही वातावरणामुळे निर्माण झाले व म.भि. चिटणीसांनी लिहलेल्या 'युगयात्रा' या नाटकाने महत्वाची भर रंगभूमीवर घातली. या सर्व नाटकातून उठा, जागृत व्हा, लढा असा संदेश द्यायचा आहे. याचवेळी तमाशा या वाङ्मय रचना प्रकाराचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या नामदेव व्हटकरांनी 'डाग' या नाटकातून तमाशात नाचणाऱ्या पोरीच्या जीवनाची वाताहात वर्णन केलेली आहे. तर 'वाटचुकली' मध्ये दलिताच्या समस्या मांडल्या आहेत.

या बरोबरच गंगाधर पानतावणे यांनी ''मृत्युशाला'' या एकांकिकेने एक वेगळीच वाट शोधली आहे. ''जिवंत झाल्या सावल्या'' या नभोनाट्यात बाबासाहेबाच्या आंदोलनाचा इतिहास मांडलेला आहे.

अशा प्रकारे हे सगळे प्रयत्न रंगभूमीच्या विकासाकरिता झाले हे खरे असले तरी रंगभूमी सिध्द करण्याचा दृष्टीने अपुरे आहेत. तमाशा, भारुडे इ. लोकानुरंजनाचे प्रकारातून दलित लेखकांना ओळखीचे आहेत. त्या प्रकाराचे सामर्थ्य विचारात घेऊन त्यांनी नाटके लिहली. ती गावकुसाशेजारी - देवळासमोर, पारावर, दलित वाड्या - वस्त्यावर तात्पुरता रंगमंच उभा करुन सादर केली. नव्या आकांक्षा - नवाविचार - नवे चैतन्य आणण्याचा प्रयत्न झाला ही कौतुकास्पद घटना आहे.

दलित कविता, रंगभूमीचा विचार केल्यानंतर दलित कथेचा विचार करावा लागतो. आपल्या अभिव्यक्तीचे एक महत्वपूर्ण माध्यम म्हणून दलितांनीकथा लिहिल्या. मुळातच कथा हा वाङ्मय प्रकार अत्यंत लवचिक असून मानवी जीवनातील अनुभवाची गुंतागुंत व तो अनुभव आविष्कृत करण्याच्या अनेकपरी यामुळे कथा वाङ्मय प्रकाराच्या सीमारेषा इतर वाङ्मय प्रकाराना जाऊन भिडलेल्या दिसतात. मराठी कथा विविध स्थित्यंतरातून अनेक दिशांनी प्रवास करीत आली आहे. त्यातच विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकाच्या आरंभापासून भारतीय जीवनात राजकीय - सामाजिक स्थित्यंतरे घडू लागली. महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या विचराचा समाजमनावर प्रभाव पडू लागला. औद्योगिकतेनेही दलितांकडे पाहण्याची भूतदयावादी दृष्टी दिली. आंबेडकरवादाने दलितांना ताठ मानेने उभे राहण्याचे बळ दिले तर मार्क्सवादाने - श्रमिकांना अस्मितेने वागण्याची जाणीव दिली. यातूनच दलित कथा आकाराला आली.

या कथावाङ्मयाचा विचार करीत असाताना सुखठणकर, सातोस्कर, ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, वामन चोरघडे यांनी दलितांविषयीच्या सहानुभूतीतून काही कथा लिहिल्या. तर श्री.म. माटे यांनी या कथा वाङमयाचा पाया घातला. त्यांच्या दृष्टीला दलित उपेक्षित वर्गातील जी वास्तव चित्रे दिसली ती त्यांनी 'उपेक्षिताच्या अंतरंगात' रेखाटली त्याच्या बन्सीधराने स्वत:प्रमाणेच समाजासमोर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले. याचवेळी आण्णाभाऊनी कामगार, मांग, मांगगारुडी, हेलकरी, अस्पृश्य अस्पृश्यातील संघर्ष - अन्ययाविरुध्द टक्कर देणारी माणसे - पोटासाठी धडपडणारी माणसे - समाज विश्व, आपल्या 'बरबाद्या कंजारी' 'भानामती', 'फरारी', 'कृष्णा काठच्या कथा ', 'गजाआड', 'जिवंत काडतूस', 'ठासलेल्या बंदुका'

चिरागनगरची भूतं', इ. कथासंग्रहातून उभे केले. आपण जे भोगले, अनुभवले तेच लिहीले अशी तुकोबा प्रमाणे.

'अनुभवासरसी आले अंगा
तेच ऊमटुनिया दिले जगा'

ही कथानिर्मिती मागील प्रेरगा आहे. फडके - खांडेकराचे आदर्श विश्व त्यांच्या समोर होते. आण्णाभाऊ साठ्यांच्यानंतर त्याचे समकालीन लेखक शंकरराव खरात - यांचेही लेखन महत्वपूर्ण आहे. ते स्वत: महार जातीत जन्मल्यामुळे त्या समाजाची सर्व दु:खे, दारिद्रय, हालअपेष्टा त्यांनी भोगल्या. अत्यंत कठिण परिस्थितीत त्यांनी उच्च शिक्षण घेतले. उच्च पदे भूषिवली म्हणून त्याच्या कथा जीवनानुभूतीतून आलेल्या आहेत. आपल्या लेखनाविषयी त्यांनी स्वत: सांगितले आहे की, " माझे प्रसिध्द झालेले ललित वाङमय कथा, कादंबऱ्या व लेख माझ्या जीवनानुभूतीतून साकारलेले आहे. अनुभूतीचे ठग भरुन याचचे आणि त्यातून पाणी बरसायचे" अशाप्रकारे आपल्या कथाविश्वातील बहुतांशी अनुभव स्वत:चेच आहेत असा निर्वाळा त्यांनी दिला आहे. 'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'सांगावा', 'टिटवीचा फेरा', 'सुटका', 'दौंडी', 'आडगावचं पाणी', 'गावशिव' 'मुलाखत' त्या नऊ कथा संग्रहातून गावकीच्या कामाने पिचून गेलेला महार, चांभार, भुरट्या चोऱ्या करणारे, भटक्या जमातीचे प्रतिनिधीत्व करणारी मंडळी रेखाटलेली आहेत. या सर्वाच्या पुढे पोटाचा गंभीर प्रश्न आहे व अस्पृश्यतेमुळे जी मानहानी अवहेलना सहन करावी लागते त्याचेही चित्रण ते तटस्थतेने करतात. त्यांच्या लेखनात आंबेडकरी प्रेरणा जाणवते.

याचवेळी ना.रा. शेंडे यांनी नावापुरत्या कथा लिहिल्या पण त्या दर्जेदार असल्यामुळे त्याचा उल्लेख अटळ आहे. 'डोंगर माथ्यावरील दिवा', 'संकल्प', 'वॉर्ड नं २३', बेड नं. २७' या तीनच कथा लिहील्या शेंड्यांच्याबरोबरीनेच गावकुसाबाहेरील दलित जीवनाचे चित्रण बाबूराव बागूल यांनी केले आहे. 'जेंव्हा मी जात चोरली होती', ' मरण स्वस्त होत आहे', 'सूड' ही दीर्घकथा लिहून एक वेगळाच ठसा त्यांनी कथा वाङ्मयात उमटविला. ग्रामीण जीवनाबरोबरच शहरी जीवनातील उपेक्षित जिणे त्यांनी समाजासमोर आणले. त्याच्या कथा प्रखर सामाजिक जाणीव व दाहक वास्तवाचे भान यातून साकारलेल्या आहेत. बाबूराव बागूलांचे समकालीन असणाऱ्या केशव मेश्रामांनीही 'खरवड', 'रुततेलेली माणसं' इत्यादितून आपल्या जीवनात जे जवळून पाहिले, आपल्या समाजाने जे दारिद्रय, लाचारीचे जीणे भोगले तेच तटस्थ वृत्तीने समाजासमोर मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला पण मूलत: ते काव्यात्म व चिंतनशील वृत्तीचे

असल्यामुळे विविध मानवी मनोवृत्तीचे दर्शन पात्राच्या बारीक - सारीक तपशीलांनी त्याची कथा आकार घेताना दिसते. तर वामन होवाळ यांचेही लेखन अनुभूतीतून जगण्यातून आलेली आहे. म्हणून त्यांच्या कथा हृदयाचा ठाव घेतात. त्यांची कथा त्यांचा गाव - त्यांच्या अवती भोवतीची माणसे, त्यांचे स्वभाव अनुभव यातून आकार घेते. प्रत्ययकारी लेखनशैली व नर्मविनोदाची किनार त्याचा लेखनाला लाभली आहे.

श्री.म. माटे शंकरराव खरात, आण्णाभाऊ साठे, केशव मेश्राम, बाबूराव बागूल, ना.रा. शेंडे, यांच्याबरोबरीने, अर्जून डांगळे यांनीही 'बांधावरची माणसे' लिहून दलित स्त्रियांवर होणारे अत्याचार चित्रित केले तर योगीराज वाघमारे यांनी 'उद्रेक', 'बेगड' इ. संग्रह लिहीले. तर योगेंद्रमेश्राम यांनीही 'रक्ताळलेली लक्तरे' लिहून हजेरी लावलेली आहे. दया पवार, शंकराराव सुरडकर, भीमराव शिरवाळे, ताराचंद खांडेकर, अरुण कांबळे, माधव कोडंविलकर, यांनी ही सहभाग दर्शवीला आहे.

दलित कथा लेखनाप्रमाणे सुवर्ण वर्णीय लेखकांनी दलित जीवन आपल्या लेखनातून समाजा समोर उभे केले ही कौतुकाची घटना आहे. व्यंकटेश मांडगूळकर - खांडेकर, मोटे इं. नावे आपल्याला या संदर्भात लक्षात घ्यावी लागतात. या अंगाने दलित कथा विश्व समृद्ध होताना दिसते त्याचे अनुभव अस्सल आहेत. दाहक वास्तवाचे भान आहे. आंबेडकरी प्रेरणा व पिढ्या नृ पिढ्याचे दास्य झुगारुन देऊन नवी मुल्ये, माणूसकी असणारा नवा समाज निर्माण करण्याची त्याची जिद्द आहे हे नाकारता येत नाही.

दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभीच विश्राम बेडेकरांची रणांगण प्रसिद्ध झाली व त्याच वाटेने मराठी कादंबरी जाईल असे वाटले, पण तसे न होता व्यक्तिनिष्ठ सुखदुःखाचे चित्रण करण्यात ती अधिक रंगली. याचवेळी काही सवर्णवर्णीयांनी आपल्या कादंबरीचा विषय दलित जीवन घेऊन कादंबरी लेखन केले ही महत्त्वपूर्ण घटना घडली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी शामसुंदर लिहली, शिरवाडकर खांडेकरही मागे राहिले नाहीत आणि दलित लेखकांना घाट-घाटाची जाणीव आली. आण्णा भाऊंनी या कालखंडात या वाङ्मयप्रकारात वेगाने घोडदौड केली. आसपासच्या प्रदेशातील दलित जीवन, दलिताचे प्रश्न, झगडे, त्यांनी 'फकीरा', 'वैजयंता', 'चंदन', 'अलगुज', 'माकडीचा माळ', 'आवडी', 'गुलाम', 'वैर', 'चिखलातील कमळ', 'वारणेचा वाघ', 'अग्निदिव्य', 'केवड्याचं कणीस', 'आग', 'संघर्ष', 'डोळे मोडीत राधा चाले' या कादंबरी विश्वातून दलित व्यथा वेदना, संघर्ष यांचा आलेख काढलेला आहे. पण फकिराची उंची कोणत्याही कादंबरीने धारण केलेली नाही. आण्णाभाऊ साठ्यांच्या बरोबरीनेच उच्च शिक्षित अशा शंकरराव खरातांनी कथा वाङ्मय प्रकार हाताळता हाताळता कादंबरी वाङ्मय लेखनाकडे उमेवदारी केलेली आहे.

'हातभट्टी', 'मी मुक्त मी मुक्त', 'टिनोपाल गुरुजी' 'मसलिदार गेस्ट हाऊस' 'पारधी', 'फुटपाथ नं. १' चा कादंबऱ्यातून दलित समस्या, जीवन चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण कसदार लेखणी असूनही म्हणावी तेवढी उंची त्यांच्या लेखनाला गाठता आली नाही. पण अगदी मोजक्याच कथा लिहून कथावाङ्मयात नाव टिकविणाऱ्या ना.रा. शेंडे यांनी मात्र महत्त्वपूर्ण विचार समोर ठेऊन कथानकाची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. 'शृंगारलेले प्रेत', 'काजळी रात्र', 'तांबडा दाग', 'विलासनी', 'अंशुजा', 'गायत्री', या कादंबऱ्यातुन लोकजीवन, चालीरिती, वृति विशेष, संघर्ष इ. चित्रण केलेले आहे. वन्य जमातीची सुधारणा घडवून आणणे हा या कादंबरीचा कणा आहे दिलतांचे जीवन त्यांनी स्वत: भोगलेले आहे पण आध्यात्मिक व अंतीद्रिय विश्वाचा ठसा त्याच्या लेखनावर दिसून येतो. शेंडे यांच्या प्रमाणेच नामदेव व्हटकरांनी एका अनाथ, तमासगीर स्त्री जीवनाचे चित्रण 'सोळा शिणगार' या कादंबरीतून घडविले आहे. त्यांचे लेखन अल्प असले तरी लेखणी कसदार आहे असेच दिसून येते. हि. गो. बनसोडे यांनी 'मुक्ति संग्राम', 'उज्वला', 'आभाळाएवढी' या कादंबऱ्यातून धर्मांतर करुन महार, मांग समाजाने गावकीची कामे नाकारुन स्वाभिमानाने जगावयाचे ठरविल्यानंतर महार-मांग व इतर गावकरी यांच्यातील सुरु झालेला संघर्ष याबरोबरच महात्मा फुले व साविश्रीबाई यांच्या संबंधीचा कृतज्ञता भाव व्यक्त केला आहे. ना.ब. शिंदे यांनी "डॉ. अंजना", "अपर्णा", "राजाभाऊ", "दे दान" या कादंबऱ्यातून वाङ्मय प्रवाहात हजेरी लावलेली आहे. तरी कवी प्रकृतीच्या केशव मेश्राम यांनी "हकीगत आणि जटायु", "पोखरण" लिहून दलितांच्या व्यथा साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच वाटेने जाऊन ज.वी. पवार यांनी 'बलीदान' कादंबरी लिहली आहे. गटबाजीने ग्रामीण भागाबरोबरच शहरी भाग, गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या राजकाराणाच्या कसा विचका केला आहे. व गटबाजीमुळे ग्रामीण दलित नेतृत्व कसे दिशाहिन होते याबद्दलचा विचार मांडला आहे. एका युगप्रवर्तकाचे जीवनचरित्र रेखाटण्याचा प्रयत्न हरिभाऊ पगारे यांनी 'युगप्रवर्तक' ही डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर कादंबरी लिहून बाबासाहेबांच्या जीवनातील महत्वपूर्ण घटनाचा आढावा घेतला आहे. निशिकांत शेंडे यांनी 'कलंक-मुक्ती' या कादंबरीतून दैववाद व नियतीच्या फेऱ्यात सापडलेल्या कुष्ठरोग वाट्याला आलेल्या सामाजिक उपेक्षाचा व त्यांना जीवन जगत असताना कराव्या लागणाऱ्या संघर्षाचा तपशील मांडलेला आहे. तर छोट्या - छोट्या प्रसंगातून भीमसेन देढे यांनी 'इस्कोट' कादंबरी आकाराला आणलेली आहे. भि. शि. शिंदे यांनी 'अमृतनाक' सुधाकर गायकवाड यांनी 'शुद्र' बाबूराव बागुल यानी 'अघोरी' नामदेव ढसाळ यांची 'हाडकी हाडवळा' - अशोक व्हटकराची 'मेललं पाणी' मुरलीधर भोसेकर 'विरंगुळा', 'मी मुर्तिमंत पाप', 'कपिलवस्तूचा राजमकुमार', 'सिध्दार्थाची यशोधरा', 'वात्सल्य तुझे स्वरुप' या कादंबऱ्यातून दलित जीवन

साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अशाप्रकारे दलित कादंबऱ्यातून वेगवेगळ्या प्रकारे दलिताच्या व्यथा - वेदना, सवर्णांशी त्याना करावा लागणारा संघर्ष, डॉ. आंबेडकराच्या विषयी कृतज्ञता भाव -बौध्दधर्माची शिकवण समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. (अर्थात कोणत्याही कादंबरीकाराने समग्र दलित जीवनाचे चित्रण साकार केलेले आहे असे म्हणता येत नाही. बाबासाहेबांनी दिलेला 'शिका', 'संघटित व्हा', 'संघर्ष करा', हाच मंत्र पुन्हा - पुन्हा येताना दिसतो. किंवा आण्णाभाऊ व शंकरराव खराताच्या कादंबऱ्याप्रमाणेच बहुतांशी कादंबऱ्या एकसुरी आहेत असेच दिसून येते.

(अशाप्रकारे नाटक, कविता, कथा, कादंबरी या मार्गाने दलित जाणिवा व्यक्त होत असताना दिसत असल्या तरी 'स्व' ची अनुभूती ह्या वाङ्मय प्रकारातून होत नाही म्हणून आत्मकथन - लेनाच्या मार्गावर बहुतांशी मंडळीचा लोभ जडलेला आहे असे चित्र आजच्या दलित आत्मकथनाचा पसारा पाहता म्हणावे लागते.) या आत्मकथनातून दलित जीवनाचे वास्तव विस्ताराने मांडलेले आहे. सामाजिक व्यवस्थेने त्याच्यावर लादलेल्या गुलामगिरीचे, नाकारलेल्या माणूसकीचे - युगानयुगे चतकोर भाकरीसाठी सवर्णांच्या दारात ताटकळत उभे राहिल्यानंतर होत असणाऱ्या यातनांचे, नाकारलेल्या ज्ञानाचे, शिक्षण घेत असताना अनुभवलेली अस्पृश्यता, म्हणजेच शोषित जीवनाबरोबरच, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय भयानक अशा हालअपेष्टांचा आलेख व आपल्या समाजात असणाऱ्या अंधश्रध्दा, अज्ञान, रुढी-परंपरा, शिक्षणाचा असणारा अभाव इ. विषयीचे चिंतन या आत्मकथनातून स्पष्टपणे मांडलेले आहे. म्हणून दलित आत्मकथनांना सामाजिमक दस्तऐवज म्हणून अन्यन साधारण महत्व आहे.

अशा या आत्मकथनात दया पवारांनी लिहिलेल्या 'बलुतं' मुळे इतर मंडळीना एक आदर्श पाठ मिळाला. दया पवारांनी आपल्या जीवनाची हकीगत म्हणजे दगडू मारुती पवाराचा कवी दया पवार होईपर्यन्तच्या प्रारंभीच्या वीस वर्षाच्या जीवन प्रवासाची कहाणी सांगितली आहे. आपले बालपण व किशोरपण समाज व्यवस्थेमुळे कसे करपले याचा तपशील त्यांनी विस्ताराने मांडला आहे. 'बलुतं' प्रमाणेच प्र. ई. सोनकांबळे यांनी आपल्या 'आठवणीचे पक्षी' या आत्मकथनातून सोशिक, भाकरीसाठी आशाळभूतपणे दिवस ढकलणाऱ्या समाजाचे, खालची जात म्हणून उपेक्षा, अन् व्यवसाय नाही म्हणून उपवासाच्या आगीत होरपळणाऱ्या जीवाचे, ज्याच्या कष्टाची कदर केली गेली नाही अशा समाजाची त्याबरोबरच स्वत:च्या जीवनात अनुभवलेली वेदना या आत्मकथनात मांडली आहे. महारी बोली. म्हणी वाक्यप्रचाराची जागोजागी

केलेली पखरण असल्यामुळे या आत्मकथनाला एक प्रकारचा रंग आलेला आहे. तर जातीने चांभार असणाऱ्या माधव कोंडविलकरांच्या ''मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' या आत्मकथनातून १९६९ ते १९७७' या आठ वर्षाच्या कालावधीत शिक्षकाची नोकरी करताना आलेले अनुभव स्पष्ट केलेले आहेत. या आत्मकथनात रोजनिशी पध्दतीचा उपयोग केलेला आहे. एका तटस्थ वा चिंतनशील वृत्तीचे दर्शन आपणाला घडते. चांभार समाजाप्रमाणेच लक्ष्मण माने यांनी 'उपरा' या आत्मकथनातून अस्पृश्यतेपेक्षाही खडतर जीवन जगणाऱ्या कैकाडी जमातीचा दु:खाचा आलेख मांडला आहे. याबरोबरच जीवन परिवर्तन घडवून आणण्यासाठी केलेला संघर्ष व आपल्या जातीच्या जीवनाची रखरख आणि होरपळ - त्यांच्या समाजाच्या चालीरिती, अंधश्रध्दा, स्त्री-जीवन, जातीपंचायत, व्यसनाधीनता इ. चित्रण साकार केलेले आहे. दलित आत्मकथनाचा विचार करताना बहुतांशी लेखक महार समाजातील आहेत असे दिसते. पण उत्तम बंडू तुपे या मातंग समाजातील लेखकाने 'काट्यावरची पोटं' लिहून अस्पृश्यता व दारिद्र्य याविरुध्द सतत संघर्ष करणाऱ्या समाजाचे जीवन अत्यंत प्रांजळ व सहज अशा शब्दात चित्रित केलेले आहे. तुपे व त्याची वेदना येथे व्यापक रुप घेताना दिसते. जन्माबरोबरच आलेली अस्पृश्यता - आईनं आपणाला या जगात जगण्याचा दिलेला मंत्र या संबंधीचा विचार विस्ताराने मांडला आहे. शहरी जीवनात राहूनही ग्रामीण भाषेशी लेखकाने फारकत घेतली नाही. आपली नाळ जिवंत ठेवली हे या आत्मकथनाचे विशेष होय. अशा मार्गानेच जाणारे ना. स. झोडगे यांनी 'फांजर' हे आत्मकथन लिहीले आहे. अर्थात हे एका कार्यकर्त्या व्यक्तीने लिहिलेले आत्मकथन आहे. आपण आपल्या जीवनात कशा प्रतिकूल परिस्थितीत प्रवास केला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीत आपले व्यक्तिमत्व कसे उंचावले, कार्यकर्ता म्हणून आपले व्यक्तिमत्व कसे घडविले, याबरोबरच गदिमाच्या 'माडगूळ' या व माण प्रदेशाचे वर्णन विस्ताराने आलेले आहे. फांजर प्रमाणेच दादासाहेब मोरे यांनी 'गबाळ' या आत्मकथनातून भटक्या कुडमुडे जोशी जमातीच्या हालअपेष्टांचे व आपल्या जीवनात आपण भोगलेल्या हालअपेष्टांचे वर्णन, खोटे भविष्य वर्तविण्याची परंपरा, घोड्यावर संसार लादून गावोगावी भीक मागत फिरणाऱ्या जमातीच्या दु:खाचे चित्रण या बरोबर त्याच्या अंगी असणाऱ्या सहनशीलतेचे वर्णन अत्यंत प्रवाही शैलीतून घडविले आहे. प्रा. रुस्तुम अचलखांब यांनी ''गावकी'' या आत्मकथनातून दलित ग्रामीण जीवनाचे त्यातील बलुतेदारीचे, प्रामुख्याने येसकरणीचे चित्रण - त्याप्रमाणेच बलुतं मागणाऱ्या प्रमुख जाती, त्यांचे हिस्सेवाटप, गावकीची काठी बदलणे, त्या बदलाची पध्दत, हाडकी हाडवळा, पदर जुळवणी इ. वेगवेगळ्या चालीरिती संबंधी माहिती मिळते. पार्थ पोळके यांच्या 'आभरान' मधून महार जमातीतील पोतराज या लोकदैवताच्या उपासकासंबंधी त्याच्या एकूण व्यवहारासंबंधी - घातक

रुढी परंपरेविषयीचे वर्णन रेखाटून त्याबद्दल चीड व्यक्त केली आहे. इथल्या समाज व्यवस्थेचा एक नवा पदर उलगडला आहे. पिढ्यान्‌पिढ्या भोगलेल्या वेदना वर्णन करीत असताना दुसरीकडे व्यक्तिगत जीवनाचे दु:ख मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. तर आत्मकथनकारात वयाँने लाहन असणाऱ्या शरणकुमार लिंबाळेनी 'अक्करमाशी'त रांडेचा पोर म्हणून व दुसऱ्या बाजूला महार म्हणून जी कुचंबणा अनुभवली, उपेक्षितांनीच केलेली उपेक्षिता अनुभवली त्याचा दु:खद अनुभव शब्दरुप केला आहे. आशयाच्या उत्कटतेमुळे हे लेखन टोकदार झालेले आहे. बेळगांव व महाराष्ट्र यांच्या सीमारेषेवरील वास्तव जीवन लिंबाळेंनी वर्णन केलेले आहे. याबरोबरच स्त्री जीवनाचे एक वेगळेच रुप त्यात साकार झालेले आहे व सवर्णवर्णीय समाजातील वासना विकाराचेही दर्शन घडते. अनैतिकतेच्या खोल गर्तेत हा समाज कसा रुतला आहे याबरोबरच महारवाडा त्याची रचना तेथील रितीरिवाज याचही चित्रण येते. अक्करमाशीप्रमाणेच शरणकुमारने 'बारामाशी' लिहिले आहे. पण अक्करमाशीची दाहकता जिवंतपणा बारामाशीत अनुभवायला मिळत नाही.

अशाप्रकारे दलित आत्मकथनाचा प्रवाह वेगाने वाहात असताना 'बलुतं', 'अक्करमासी', 'काट्यावरची पोटं', 'गबाळ' यासारखी आत्मकथने मैलाच्या दगडाप्रमाणे या प्रवाहात उभी राहिली याचा आदर्श घेऊन लक्ष्मण गायकवाडांनी 'उचल्याचे' लेखन केले. वर्ण व्यवस्था व समाजव्यवस्थेने नाकारलेल्या अशा उचल्या किंवा पाथरुड जातीत जन्मलेल्या नॉनमॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या एका कार्यकर्त्याचे हे मनोगत आहे. उचल्याच्या जातीत जन्मल्यामुळे जे दु:ख भोग आपल्या वाट्याला आले त्याची झाडाझडती व आत्मपरिक्षण, समाजनिरिक्षण अशा दुहेरी पातळीवर हे लेखन झाले आहे. आपल्या समाजात असणारे जातीपंचायतीचे महत्व, चोरी केल्यानंतर गुन्हा कबूल होऊ नये म्हणून मार सहन करण्याचे दिले जाणारे धडे चोरी, खिसे कापणे, भुरट्या चोऱ्या करण्यासंबंधीचे प्रशिक्षण या संबंधीचा तपशील विस्ताराने येतो आणि उच्च संस्कृतीची स्तोत्रे गाणाऱ्यासमोर वेगळ्याच एका संस्कृतीचे रुप उभे राहते. याच पध्दतीने ना. म. शिंदे यांनी 'जातीला जात वैरी' या आत्मकथनातून ढोर, चांभार या समाजातील ताणतणावाचे चित्रण केले आहे. आत्माराम राठोड यांनी 'तांडा' यात नायकप्रधान असणाऱ्या जाती-जमाती त्यांच्या अवैध धंद्याची, जातपंचायतीची, अंधश्रध्दा, दैववाद व अस्पृश्यांच्यातील उच्च-नीच भावनांचे दर्शन समाजासमोर मांडलेले आहे तर पा. ऊ. जाधव यांनी 'माहुडा' यात अस्मिता दर्शनाच्या वाचनाने एक आत्मपरिक्षणाची संधी आपणाला कशी मिळाली, आपले एम. ए. पर्यंतचे शिक्षण, दलित स्त्री-जीवन, जातीयतेमुळे वेळोवेळी सहन करणारा अपमान यातच वऱ्हाडी बोलीचा वापर करुन हे आत्मकथन वाचकासमोर मांडले आहे. जाधव यांच्याच समकालीन असणाऱ्या ल.स. रोकड्यांनी 'झळा' या आत्मकथनात लहानपणी येस्करपाळी मागण्यापासून ते

बी.ए., एलएल.बी होऊन डिव्हीजनल ऑडिट ऑफिसर होण्यापर्यंत आपण कशी प्रगती केली हे स्पष्ट करीत असताना तत्कालीन समाजाचे जीवन दर्शन घडविलेले आहे. समाजपरिवर्तनाला प्रेरित व्हावा त्यांनी आत्मपरीक्षण करावे अशी त्यांची प्रांजळ भूमिका आहे. याच पद्धतीने प्रा. भाग्यवंत तुषार यांनी 'कोंडाळ' यातून आपल्या आरंभीच्या शिक्षणापासून ते एम.ए. होऊन प्राध्यापक होईपर्यंतच्या जीवनप्रवासाची, समाजजीवनातील विविध सादपडसादाची तराळ-अंतराळपासून आपण घेतलेल्या स्फूर्तीची एकसंघ व सूत्रबध्द मांडणी केलेली आहे. याच वाटेने जाऊन श्रीरंग तलवारे यांनी 'धूळपाटी' या आत्मकथनाचे लेखन केलेले आहे.

अशाप्रकारे दलित आत्मकथनाचा प्रवाह वेगाने वहात असताना या लेखनकार्यात पुरुष मंडळीस अधिकत्वाने दिसून येते. असे असले तरी दलित स्त्री मनही जागृत आहे असे आपणाला दलित स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनातून दिसून येते. प्रा. सौ. कुमुद पावडे यांनी 'अंतस्फोट' मधून 'स्व' ची जाणीव झाल्यापासून ते विवाह नौकरी या स्थित्यंतराच्या कौटुंबिक जीवनाचे सामाजिक जीवनातील प्रश्नाच्या अनुषंगाने चित्रण केलेले आहे व तथाकथित उच्चभ्रू जीवनश्रेष्ठत्वाचा अभिमान बाळगणाऱ्या जातीचा फोलपणा त्यांनी सिध्द केलेला आहे. हे सर्व लेखन अंत:करणाच्या एका वेगळ्या उर्मीतून लिहिले आहे. वास्तव दृष्टिकोनातून तसेच चिंतनशील विचारातून दलित जीवन व स्त्री जीवन या दोन्ही बाजू विचारात घेऊन आत्मपरिक्षणाची जोड देऊन परिवर्तनाची दिशा दाखवून समाजाला विचार प्रवृत्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याा स्वप्नांना सत्यात उतरवित असताना त्यांचे अनुयायीच कसे आडफाटे घालतात याची नोंद त्यांनी केलेली आहे. याच पध्दतीने मुक्ता सर्वगोड यांनी 'मिटलेली कवाडे' मधून जन्माने दलित असणाऱ्या परंतु संस्काराने दलित नसणाऱ्या, ज्यांनी स्वत:ची जात सोडून दिली आहे अशा समाजसेवेचे व्रत घेणाऱ्या एका समाजसेविकेचे हे आत्मकथन आहे. त्यातून आपल्या व्यक्तिगत आठवणीच्या माध्यमातून समाजदर्शन घडविणे हा मुख्य हेतू त्यांनी सांगितला आहे. समाजसेवा करताना होणाऱ्या चुका, समाजसेवेच्या खऱ्या गरजा व उणिवा त्यांनी वाचकासमोर प्रांजळपणे मांडलेल्या आहेत. याचपध्दतीने बेबी कांबळे यांनी 'जीनं आमुचं' यात आपल्या समाजाच्या पूर्वायुष्याचे चित्रण व अस्पृश्य समाजातील स्त्री-जीवन अनिष्ट रुढी प्रथा-परंपरा यांचा पगडा हे सर्व थांबविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी केलेले प्रयत्न व त्यांच्याविषयीचा कृज्ञतेचा भाव व्यक्त केला आहे. अशा रितीने दलित आत्मकथनाचा विचार केल्यानंतर दलित आत्मचरित्राचाही विचार करावा लागतो. अर्थात बोटावर मोजण्याइतकीच आत्मचरित्रे या लेखकाकडून लिहिली गेली. बहुतांशी आत्मचरित्रे एका वेगळ्या उंचीवर गेल्याचे आपणाला दिसते. अशा या आत्मचरित्राचा अभ्यास करताना

सर्वप्रथम विठ्ठल बाबाजी पालवणकर उर्फ पी. विठ्ठल यांनी लिहिलेल्या 'माझे क्रिडा जीवन' या आत्मचरित्राचा विचार करावा लागतो. यात दलित जीवनाच्या चित्रणाबरोबरच क्रिडा क्षेत्रात आपण जी लक्षणीय प्रगती केली. त्याचा तपशील आला आहे व स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील मुंबई महानगरातील दलित जीवनाचा परिचय आपणाला घडतो. त्यानंतर स. ना. सूर्यवंशी यांच्या 'अगा जे कल्पिले नाही' या आत्मचरित्रात स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील अस्पृश्यांचे जीवन व सवर्ण अस्पृश्याचे संबंध, अस्पृशांनी धर्मांतर केल्यानंतर समाजजीवनात झालेले बदल इत्यादि माहितीच्या बरोबर एकसंघ व्यक्तिमत्वाचा परिचय आपणाला होतो. सवर्णवर्णीयाविषयी एक आदाराची भावना त्यांच्या ठिकाणी असल्याचे दिसते [याचवेळी शंकरराव खरातांनी 'तराळ-अंतराळ' या आत्मचरित्राचे लेखन केले होते. याही आत्मचरित्राचा अभ्यास करताना एका संथ, प्रगल्भ, कृतिशील, सृजनशील व्यक्तिमत्वाचा, या व्यक्तिमत्वाने आपले व्यक्तिमत्व उंचावण्यासाठी घेतलेल्या कष्टाचा, त्यागाचा त्याचवेळी समाजाविषयी जी बांधिलकी त्यांनी दाखविली आहे त्यातून एका प्रगल्भ व्यक्तिमत्वाचा परिचय आपणाला होतो. आत्मनिरीक्षण व सिंहावलोकनात्मक दृष्टीकोनातून हे लेखन झालेले आहे. म्हणून या आत्मचरित्राचा 'दीपस्तंभ' म्हणून उल्लेख केला जातो. अर्थात अनेकजणांनी या लेखनापासून स्फूर्ती घेतलेली आहे. म्हणून ही उपमा योग्यच वाटते] यानंतर नामदेव व्हटकरांच्या 'कथा माझ्या जन्माची' या जन्माने ढोर, चांभार असणाऱ्या लेखकाने आपल्या जन्मापासून जे दलितत्व आपल्या वाट्याला आले व त्या अनुषंगाने आंबेडकरी चळवळीचा आपल्या जीवनावर पडलेला प्रभाव वर्णन केलेला आहे. अर्थात लेखकाच्या मृत्युनंतर त्यांच्या मुलाने हे आत्मचरित्र प्रसिध्द केलेले आहे. ही गोष्ट कौतुकास्पद आहे. या बरोबरच शालेय जीवनात भोगलेली अस्पृश्यता हिणकस जीवन नोकरी करता करता आपण केलेली समाज सेवा प्रशासक, नभोवाणी अधिकारी, चित्रपट दिग्दर्शक, लोककला अभ्यासक, प्रगतशील शेतकरी, जागृत आमदार अशा वेगवेगळ्या व्यक्तिमत्वाचा परिचय आपल्याला होतो.

दलित आत्मकथना प्रमाणेच दलित आत्मचरित्रलेखनात पुरुष मंडळी अग्रेसर आहेत असे दिसत असले तरी स्त्रीयांनीही आत्मचरित्राचे लेखन करुन विकसनशीलतेकडे पाऊल टाकलेले आहे, हे नाकारता येत नाही. सौ. शांताबाई कांबळे यांनी 'माझ्या जल्माची चित्तरकथा' लिहून सिध्द केलेले आहे. दलित स्त्रीयांच्या समोर एक आदर्श या पुस्तकाच्या रुपाने उभा आहे. या लेखनातून शिक्षणाची संधी मिळालेल्या दलित स्त्रीच्या संघर्षमय जीवनाची कहाणी आली आहे. शिक्षणाला सुरुवात झाल्यापासून ते शिक्षणाधिकारी म्हणून सेवानिवृत्त होईपर्यंतचा कालखंड यात आला आहे. डॉ. बाबासाहेब अंबेडकरांच्या विषयी कृतज्ञता भाव यात व्यक्त झाला आहे.

अशा रितीने दलित आत्मकथनांचा विचार केल्यानंतर -

'स्वातंत्र्य कुण्या गाढवीच नांव आहे'

किंवा

आज विषाद वाटतो कशा वागवल्या मणामणांच्या बेड्या

गाळात हत्तीचा कळप रुतावा तशा

ध्येय आकांक्षा रुतलेल्या

शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा

या वेदना, विद्रोह, नकाराच्या साहित्याचे मुल्यमापन करण्यासाठी समिक्षा ही अवतरली पण रुढ पध्दतीने या साहित्याचे मुल्यमापन होत नाही. म्हणून नव समिक्षा पध्दती तंत्र या लेखकाने निर्माण करण्याचे चंग बांधला आहे हे ही कौतुकास्पद आहे.

धर्माच्या जातीच्या, संस्कृतीच्या नावाने उभे असणाऱ्या भिंतीच्या आसऱ्याला त्यांनी उभे राहण्याचे नाकारले आहे. कारण त्या भिंती आपणाला चिरडतील ही भिती त्यांना वाटते. म्हणून तडजोड टाकून सर्व थरातून वादळ उठवा, भिंतीचा अनादीबंध तोडा, जे जे हरकत घेतील त्यांना उकळत्या तेलाच्या कढईत टाका त्यांच्या गावा वाड्या वस्त्यावरुन गाढवाचा नांगर फिरवा, त्यांची मुंडकी वेशीवर टांगा अशी सर्वकष क्रांतीची त्यांची तयारी आहे. जे जे कालबाह्य पीडक अन्याय करणारे आहेत त्याच्या भजनाला विद्रोह प्रवृत्त होतो. व त्या विद्रोही प्रवृत्ती नव्या मुल्याची प्रतिष्ठापना करीत असतात, भजनातून नवे सर्जन होत असते. दलित साहित्य अस्पृश्यता, सांस्कृतिक परंपरा नाकारीत आहे. ते जुन्या बुरसटलेल्या कल्पनेच्या विरुध्द आहे. त्या पाठीमागे महात्मा फुले, डॉ. आंबेडकर, मार्क्स, फ्रेंच राज्य क्रांती, निग्रो साहित्य आहे. त्यासाठी त्यांना मुल्यमापन हवे आहे. हे मुल्य मापन करण्यासाठी परंपरागत सौंदर्यवाद वास्तव वाद , अभिजात वाद, सौंदर्य वाद त्यांनी नाकारला आहे. व या साहित्याला ज्या मातीचे संदर्भ आहेत, त्या मातीचा विकासाच्या अनुशंघाने समिक्षा ही बदलावी हीच त्यांची भूमिका आहे.

याच हेतूने रा.ग. जाधव यांनी 'निळी पहाट', 'निळी क्षितीजे', अर्जून डांगळे यांनी 'दलित साहित्य एक अभ्यास', बाबूराव बागुल यांनी 'दलित साहित्य' एक क्रांती विज्ञान, शंकरराव खरात

यांनी 'दलित वाङ्मय प्रेरणा व प्रवृत्ती', प्रभाकर मांडे 'दलित साहित्याचे निराळेपण', जनार्दन वाघमारे 'हाकआणि आक्रोश', यशवंत मनोहर 'दलित साहित्य सिध्दांत आणि स्वरुप', म. सु. पाटील यांनी 'दलित कविता', वासुदेव मुलाटे 'सहा दलित आत्मकथने', योगेंद्र मेश्राम 'दलित साहित्य जेंव्हा चळवळ बनते', केशव शिरवाडकर 'मार्क्सवादी साहित्य विचार', वि. स. जोग 'मार्क्सवाद व दलित साहित्य'.

या समिक्षा ग्रंथाबरोबरच राजा जाधव 'दलित साहित्य एक चिंतन', बाळकृष्ण कवठेकर 'दलित साहित्य एक अभ्यास', वसंत डोळस 'दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप', डॉ. कुसरे कुलकर्णी 'दलित स्वकथने साहित्य रुप', गो. ग. कुलकर्णी 'साहित्य दलित आणि ललित', वि. ज. सोनकवडे 'दलित साहित्य का नको'?, गंगाधर पानतावणे 'दलित कथा'.

अशा वेगवेगळ्या लेखकांनी वेगवेगळ्या प्रकारे समिक्षा केली. यातून वेदना, विद्रोह, नकार, रुपबंध, आदिबंध, मार्क्स, डॉ. आंबेडकर व दलितांच्या नव्या नव्या जाणिवा इत्यादि चर्चा विस्ताराने केली आहे.

याप्रमाणेच सिध्दार्थ रिसर्च इन्स्टिट्यूट, दलित साहित्य संसद, बौध्द साहित्य परिषद यासारख्या संस्थांनी दलित साहित्य विकासाच्या दृष्टीने, तर गंगाधर पानतावणे यांच्या संपादकत्वाखाली निघणारे 'अस्मितादर्श' हे नियतकालिक दलित साहित्य प्रचार आणि प्रसाराचे कार्य जोमाने करीत आहे. याबरोबरच 'अनुष्टुभ', 'अबकडई', 'आम्ही', 'डुब', 'प्रतिष्ठान', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'मौज', 'युगवाणी', 'ऋतुगंध', 'ललित', 'लोकराज्य', 'विशाखा', 'समुचित', 'सत्यकथा', 'समाजप्रबोधन पत्रिका', 'मराठवाडा' या नियतकालिकांनी या वाङ्मयाच्या जडणघडणित मोलाचा वाटा उचलला आहे. तर दै. लोकसत्ता, दै. सकाळ, दै. संचार, दै. महाराष्ट्र टाईम्स इ. वृत्तपत्रांनी या कार्याला हातभार लावला आहे. याबरोबरीनेच १९४५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्युकेशन' सोसायटीच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या महाविद्यालयांचेही योगदान या साहित्याच्या संदर्भात बहुमोलाचे आहे. वेळोवेळी साजरी होणारी साहित्य संमेलने यांचेही कार्य बहुमोलाचे आहे.

अशाप्रकारे 'पूर्वाभ्यासाचे स्वरुप' अभ्यासत असताना आपणाला वेगवेगळे वाङ्मय प्रकार व त्यातून आलेले दलित जीवन नजरेसमोर येते. अर्थात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या मंडळींनी गावकुसाच्या बाहेर येऊन शिक्षण घेतले, औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभाग दर्शविला, फ्रेंच राज्यक्रांतीचा अभ्यास केला व लेखणी हातात घेऊन आपणाला जमेल तसे व जमेल त्या मार्गाने आपल्या व्यथा वेदनांना वाट करुन

दली ही गोष्ट कौतुकास्पद आहे. एखाद्या खाली मान घालून वर्षानुवर्ष औत ओढणाऱ्या बैलाने औत टाकून देऊन हाकणाऱ्याविरुध्द एके दिवशी बंड करावे तशीच ही घटना आहे. ही अद्भूत घटना दलितांच्या लेखणीने केली आहे.

जे पिढ्यानपिढ्या राबत आहेत, अक्षरापासून, धर्म ग्रंथापासून, गावकुसाच्या बाहेर दूर आहेत. पाण्यासाठी, घासभर उष्ट्या अन्नासाठी दिवसदिवस ताटकळत उभे आहेत त्यांनी आपले दुःख शब्दबध्द करावे ही घटनाच मनोहारी आहे. या लेखनामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूकनायक, प्रबुध्द भारत, जनता इत्यादितून केलेले लेखन व महात्मा फुले, फ्रेंच राज्यक्रांतीच्या मंथनातून निघालेली स्वातंत्र्य, समता, बंधुतेची शिकवण आहे व शिका, संघटित व्हा, संघर्ष करा ही प्रेरणा आहे. शाहू राजाचे पाठबळ आहे, कर्मवीरांचे स्वावलंबन आहे हे या अभ्यासातून आपल्या लक्षात येते व या सर्वाविषयी या मंडळींनी कृतज्ञता भाव दर्शविला आहे. युगानयुगे अंधारात असणाऱ्या या माणसांना प्रकाशाची ओढ आहे. आम्ही माणसे आहोत, आम्हालाही मन आहे व सवर्णाच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात काम करण्याची पात्रता आपल्यात आहे हे सिध्द केलेले आहे. प्रसंगी रक्तरंजित क्रांतीसाठी ते सज्ज आहेत. पांढरपेशा समाजातील लेखकाप्रमाणे अनुभूतीविरहित लेखन न करता भोगलेले, पाहिलेले, साहिलेले त्यांनी मांडलेले आहे. म्हणून हे लेखन मनाचा ठाव घेते. या लेखनातून नवा माणूस, नवा समाज जो माणसावर प्रेम करतो, जो माणसातच देव पाहतो, माणसाचीच पूजा करतो, जात-पात, धर्म-पंथ संस्कृती मानीत नाही अशा समाजाची निर्मिती हे त्यांचे ध्येय आहे. म्हणजेच एका ध्ययेयाने प्रेरित होऊन त्याची निर्मिती झाली आहे. 'जगा आणि जगू द्या' एवढीच त्यांची मागणी आहे.

याा विशेषांचा विचार केल्यानंतर या लेखनातील मर्यादांचाही विचार करावा लागतो. कारण या साहित्यातून फक्त आपल्या समाजाच्या व्यथा वेदना, पिळवणूक इत्यादिसंबंधी वेळोवेळी टाहो फोडला आहे. आपल्याच सुखदुःखांना ही मंडळी कुरवाळीत आहेत. सतत सवर्णाविरुध्द नकाराची घंटा वाजवित आहेत. सवर्णामध्ये जे जे चांगले आहेत त्यांचे ऋण कोठेही मांनल्याचे दिसत नाही. बहुतांशी लेखन हे एकसुरी झालेले आहे. बऱ्याचवेळा वेळीअवेळी या मंडळींनी बंडाची भाषा उच्चारली आहे. आण्णाभाऊंच्या 'स्मशानातील सोनं', वामन होवाळ 'मजल्याचं घर', खरातांचे 'तराळ-अंतराळ', नारायण सुर्वेंची 'आई' इत्यादिच्या पुढे हे लेखन गेले नाही. समग्र दलित जीवन कवेत घेईल असे एकही नाटक, कथा, कादंबरी, आत्मकथन, चरित्र, आत्मचरित्र या मंडळीकडून लिहिले गेलेले नाही. बहुतांशी लेखन अस्पृश्य-

अस्पृश्यांच्या झगड्यानेच भरलेले आहे. अक्षरसाहित्याच्या उंचीला एकही कलाकृत गेली नाही. महाकाव्य, खंडकाव्य या वाङ्मय प्रकाराल स्पर्श न करता आत्मकथनातच या मंडळींनी समाधान मानलेले आहे. या साहित्याबरोबरच या साहित्याच्या सौंदर्याविषयी निश्चित मते नाहीत व त्याविषयी उदासिनवृत्ती दिसून येते. रा. ग. जाधव, प्रभाकर मांडे, शरणकुमार लिंबोळे यांच्यापुढे समिक्षकाची पिढी निर्माण झाली नाही. बऱ्याचवेळा पैसा व प्रसिध्दीच्या हव्यासापायी लेखन होत आहे असे नजरेस येते.

आज शासनाने अनेक सोई सवलती, गाव तेथे शाळा, महाविद्यालय, नौकरीत आरक्षण, वृत्तपत्रे, दूरदर्शन ठिकठिकाणी जाऊनसुध्दा दलित स्त्रिया या आपले भावविश्व मर्यादितच ठेवतात. सकस व दर्जेदार लेखन त्यांच्याकडून होत नाही यापाठीमागे दलित पुरुष मंडळी आहेत असेच नजरेत येते. बरेच लेखक एका जातीमधील असल्यामुळे एकप्रकारची कंपूशाही या मंडळीत निर्माण झाली आहे. विशेषत: पवित्र अशा या क्षेत्रात राजकारण या मंडळीकडून आणले जात आहे. पैसा व प्रसिध्दीसाठी समाजाला झुगारुन देऊन सुखाच्यापाठीमागे पळणाऱ्या मंडळीचा भरणा या मंडळीत जास्त दिसतो हे कबूल करावे लागेल. त्यामुळे रा. ग. जाधव, शंकरराव खरात, प्रभाकर मांडे यासारख्या एकांड्या शिलेदारालाच वाट तुडवावी लागत आहे.

# संदर्भ टिपा


१) तराळ - अंतराळ - शंकरराव खरात, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - ३०. प्रथमावृत्ती १९८१, पृष्ठे ४२६.

२) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह - डॉ. भालचंद्र फडके,श्री विद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३०.प्रथमावृत्ती १९७७, पृष्ठे २२४.

३) दलित स्वकथने साहित्य रुप - प्रा. डॉ. सौ. आरती कुसरे कुलकर्णी, विजय प्रकाशन, नागपूर - ४४० ०१२.प्रथमावृत्ती १९९१, पृष्ठे १८७.

४) निळी पहाट - रा. ग. जाधव, प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, जि. सातारा.प्रथमावृत्ती १९७८, पृष्ठे १५६.

५) दलित साहित्य आणि प्रवाह आणि प्रतिक्रिया - गो. म. कुलकर्णी मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे - ३०.प्रथमावृत्ती १९८६, पृष्ठे १७९.

६) दलित साहित्य प्रेरणा आणि स्वरुप - डॉ. वसंत डोळस, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. २५१ क, शनिवार पेठ, पुणे.प्रथमावृत्ती १९९२, पृष्ठे १६०.